## सूचना (NOTIFICATION)

### महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सरळसेवा भरती - २०२१

म्हाडा सरळसेवा भरती २०२१ करीता दि.१२.१२.२०२१ ते दि.२०.१२.२०२१ या दरम्यान चार टप्प्यांमध्ये परीक्षा घेण्यात येणार होती. तथापि, दि.११.१२.२०२१ रोजी भरती प्रक्रिया राबविण्याकरीता नियुक्त केलेल्या कंपनीचे संचालक यांना सायबर पोलीस, पुणे यांनी म्हाडा सरळसेवा भरतीच्या प्रश्नपत्रिकेबाबत गोपनीयतेचा भंग केल्यामुळे ताब्यात घेतले व अटक केली. पोलीस व म्हाडा प्रशासनाने संयुक्तपणे कारवाई केल्यामुळे अनुचित प्रकार घडला नाही.

सुयोग्य, गुणवंत व पात्र उमेदवारांवर अन्याय होऊ नये याकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने दि.१२.१२.२०२१ ते दि२०.१२.२०२१ दरम्यान चार टप्प्यात घेण्यात येणारी परीक्षा **तात्काळ** रद्द केली. सदर परीक्षा आता दि.०१.०२.२०२२ ते दि.१५.०२.२०२२ या दरम्यान Tata Consultancy Services (TCS) यांच्या मार्फ़त घेण्यात येईल.

दि.०१.०२.२०२२ ते दि.१५.०२.२०२२ दरम्यान होणारी परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येईल. परीक्षेचे तपशिलवार वेळापत्रक व अन्य सूचना लवकरच म्हाडाच्या संकेतस्थळावरून प्रसिध्द करण्यात येतील.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**